# पांडवांची कथा



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क. ३२३



BVBK-0400323

जय हिन्द प्रकाशन



बा वा
नों क्र. ३२३



# पांडवांची कथा

: लेखक

भालचंद्र महादेव वैद्य

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल साहित्य विभाग.
बा. क्र. ३२३
विषय

जयहिंद प्रकाशन

BVBK-0400323

मूल्य ५० पैसे

* मुद्रक
वि. ज. देसाई
वैभव प्रिंटिंग प्रेस
मुंबई नं. ४

※

* प्रकाशक
रवींद्र गजानन रायकर
जयहिंद प्रकाशन
१० बी, झावबाची वाडी
ठाकुरद्वार, मुंबई २

※

* प्रथमावृत्ती
१ मे १९६५

* नवीन आवृत्ति
१५ एप्रिल १९७७

※

* मुखपृष्ठ
श्री. रघुनाथराव कंटक
विलेपार्ले–मुंबई ४

## दोन शब्द

**करी मनोरंजन जो मुलांचें ।**
**जडेल नातें प्रभुशीं तयांचें ॥**

शिक्षणाचा प्रसार वाढतो आहे, लोकसंख्या वाढते आहे, त्याबरोबरच सध्यां शिकणाऱ्या आणि अल्प-शिक्षित अशा दोघांनाही योग्य असें वाचनीय वाङ्मय उपलब्ध करून देणें जरूरीचें झालें आहे. त्या बालमनाला आणि अन्य साक्षरांना रुचतील, त्यांच्या मनाची पटकन पकड घेतील, अशींच पुस्तकें त्यांच्या हातीं दिलीं पाहिजेत. एवढेंच नव्हें, तर तीं पुस्तकें छोटीं छोटीं असावयास पाहिजेत; तसेंच त्यांची किंमतही अल्प असावयास पाहिजे.

राक्षसांच्या गोष्टी, जादूच्या गोष्टी, भुतांखेतांच्या गोष्टी, धार्मिक गोष्टी मुलें व मोठीं माणसेंही अत्यंत आवडीनें वाचतात. ही वस्तुस्थिति ध्यानांत घेऊन अशीं प्रकाशनें प्रसिद्ध करण्याची ही योजना मराठींमध्यें तरी अपूर्व अशी आहे. तीन रंगी बाह्यचित्रें, आंतील विषयानुरूप चित्रें आणि सुंदर छपाई, यामुळें तीं चटकन उचलून सर्वांना वाचावींशीं वाटतील. हे पुस्तक मुलांना फार आवडेल.

—प्रकाशक

# कौरव आणि पांडव

सुमारें पांच हजार वर्षांपूर्वींची गोष्ट. त्या वेळीं आपल्या भारतांत खूप मोठीं अरण्यें होतीं. लोकवस्ती अगदीं थोडी होती.

जेथें लोकवस्ती असे तेथें लहान लहान राज्यें असत.

ह्या राज्यांतलेंच हस्तिनापूर हें एक राज्य.

हस्तिनापूरचा राजा विचित्रवीर्य. ह्या विचित्रवीर्याला तीन मुलगे होते. सगळ्यांत मोठा धृतराष्ट्र, दुसरा पंडु नि तिसरा विदुर.

विचित्रवीर्याच्या मृत्यूनंतर राजकारभार पाहाण्याचे सगळें काम पंडूला करावें लागलें, कारण धृतराष्ट्र जन्मापासूनच आंधळा होता.

धृतराष्ट्राला शंभर मुलगे होते. त्या सगळ्यांना कौरव म्हणत. कौरवांच्या आईचें नांव गांधारी.

पंडूच्या दोन बायका होत्या. एकीचें नांव कुंती नि दुसरीचं माद्री.

कुंतीला धर्म, भीम, अर्जुन असे तीन व माद्रीला नकुल आणि सहदेव असे दोन मुलगे होते. ह्या पांचांना पांडव असें म्हणत.

कौरव नि पांडव चुलतभाऊ होत. लहानपणीं ते एकत्र राहात असत.

कौरवांचा पुढारी दुर्योधन नि पांडवांचा धर्म.

एकदां कौरव नि पांडव मैदानांत विटीदांडूचा खेळ खेळत होते. मैदानांजवळ एक विहीर होती.

खेळ ऐन रंगांत आला होता.

इतक्यांत विटी त्या विहिरींत पडली. विहिरींत पाणी नव्हतें, पण ती फार खोल होती.

खेळ बंद पडला. सगळेजण त्या विहिरीभोंवतीं जमले. पण विटी कशी काढावी हें कोणालाच समजेना.

ह्याच वेळीं द्रोणाचार्य नांवाचे एक ऋषि त्या वाटेनें जात होते. मुलें विहिरीशीं जमलेलीं पाहून काय झालें असें द्रोणाचार्यांनीं त्यांना विचारलें.

मुलांनीं त्यांना विटीची हकीकत सांगितली.

द्रोणाचार्य धनुर्विद्येंत पटाईत होते. ते म्हणाले, 'मुलांनो, मी बाण मारून तुमची विटी वर काढतों पहा.'

मग द्रोणाचार्यांनीं नेम धरून बाण सोडला.


बाण विटीला लागतांच विटी उंच उडाली नि जमिनीवर पडली. द्रोणाचार्यांचें धनुर्विद्येचें कसब पाहून त्या मुलांना मोठें आश्चर्य वाटलें. ते द्रोणाचार्यांना म्हणाले, 'महाराज, आम्हांला शिकवाल का ही विद्या?'

द्रोणाचार्यांनीं 'हो' म्हटलें.

कौरव-पांडवांना आनंद झाला. ते द्रोणाचार्यांना राजवाड्यांत घेऊन गेले.

भीष्म हे कौरवपांडवाचे चुलत आजोबा. त्यांनीं द्रोणाचार्यांना ह्या राजपुत्रांचे गुरु म्हणून काम करण्याची विनंति केली. द्रोणाचार्यांनीं होय म्हटलें.

तेव्हांपासून द्रोणाचार्य कौरव-पांडवांचे गुरु झाले.



द्रोणाचार्यांनीं ह्या राजपुत्रांना धनुर्विद्या, मल्लविद्या, गदायुद्ध, शस्त्रें चालविणें, अस्त्रविद्या वगैरे युद्धकलेचें सगळ्या प्रकारचें शिक्षण दिलें.

## ❀ भीमाला मारण्याचा बेत

पांडवांची हुशारी पाहून कौरव त्यांचा द्वेष करूं लागले. पांडवांचा नाश करावा म्हणजे सगळें राज्य आपणांस मिळेल असें त्यांना वाटूं लागलें. पण उघड उघड कांहीं करतां येईना.

पांडवांपैकी भीम हा लहानपणापासून खूप बलवान होता.

कुस्त्या खेळण्यांत नि गदायुद्धांत तो चांगलाच पटाईत झाला. त्याचा पराक्रम पाहून कौरव त्याचा द्वेष अधिकच करूं लागले.

आपल्यापेक्षां वरचढ अशा ह्या भीमाचा कसेंही करून नाश करायचा असें दुर्योधनानें मनाशीं ठरविलें.

एके दिवशीं हे सगळे राजपुत्र दूरच्या सरोवरावर जलक्रीडा करण्यासाठीं गेले.

तेथें संधि साधून दुर्योधनानें भीमाला फराळाच्या पदार्थांतून विष चारलें. विष अंगांत भिनल्यामुळें भीम बेशुद्ध पडला. इतक्यांत रात्र पडली, तेव्हां इतरांना कांहीं कळूं न देतां कौरवांनीं भीमाला सरोवरांत फेंकून दिलें.

दुसऱ्या दिवशीं सगळे राजपुत्र हस्तिनापुरांत परत आले.

भीम परत आला नाहीं हे पाहून पांडवांना नि कुंतीला मोठी काळजी पडली.

इकडे भीमाला सर्प चावले. त्यामुळें भीमाच्या शरीरांतलें विष नाहींसें झालें. तो शुद्धीवर आला नि दुसऱ्या दिवशीं राजधानींत परत आला.

पांडवांना आनंद झाला. कौरवांनीं वरवर आनंद झाला असें दाखविलें, पण मनांतून त्यांना आश्चर्य वाटलें नि वाईटपण वाटलें.

## परीक्षा

पांडवांची हुशारी पाहून गुरुजी त्यांना नेहमीं शाबासकी देतात हें कौरवांना आवडत नसे.

कसेंही करून पांडवांचा नाश करण्यासाठीं ते प्रयत्न करूं लागले.

धनुर्विद्येत अर्जुन तरबेज होता. त्याच्यापेक्षां आपण वरचढ व्हावें असें दुर्योधनाला वाटूं लागलें. एकदां संधि साधून तो

द्रोणाचार्यांस म्हणाला, 'गुरुजी, एकाच बाणानें आपल्या अनेक शत्रूंचीं शिरें उडविण्याची कला अर्जुनाला न शिकवितां मला शिकवा.'

त्यावर द्रोणाचार्य हंसून म्हणाले, 'ठीक.'

ह्या वेळीं ते एका वडाच्या झाडाखालीं उभे होते.

द्रोणाचार्य दुर्योधनास म्हणाले, 'तूं म्हणतोस तसें मी करीन, पण आधीं तूं ह्या वडाचीं पानें देठ कायम ठेवून छेदून दाखव.'

दुर्योधनानें गुरुजींच्या आज्ञेप्रमाणें प्रयत्न करून पाहिला, पण त्याला तें कांहींच साधलें नाहीं.

ह्याच वेळीं तेथें अर्जुन गुरुजींसाठीं पाण्याची झारी घेऊन येत होता. त्यानें वडाची अर्धवट तुटलेलीं पानें पाहिलीं. लागलीच एका बाणाच्या टोंकावर झारी ठेवून तो बाण आकाशांत सोडला व झारी खाली येण्याच्या आंत दुसरा बाण सोडून वडाचीं पानें तोडलीं. इतक्यांत झारी खालीं आली ती वरचेवर झेलून गुरुजींच्या हातांत दिली.

हें पाहून द्रोणाचार्यांनीं खूश होऊन अर्जुनाला शाबासकी दिली.

दुर्योधन मनांतून हिरमुसला झाला.

पुढें लवकरच गुरुजींनीं शिष्यांची परीक्षा घेण्याचें ठरविलें.

राजपुत्रांच्या परीक्षेसाठीं मोठा मंडप उभारला. ठरलेल्या दिवशीं हस्तिनापुरांत हजारों नागरिक राजकुमारांचें कौशल्य पहाण्यासाठीं मंडपांत जमले.

परीक्षेला सुरुवात झाली. प्रथम भीम व दुर्योधन यांनीं

गदायुद्ध करून दाखविलें. नंतर मल्लयुद्धाचे व इतर शस्त्रांचे खेळ झाले.

शेवटीं नेम मारण्याची परीक्षा सुरू झाली.

उंच झाडावर टांगून ठेवलेल्या लांकडी पोपटाचा डोळा नेम मारून फोडावयाचा होता.

द्रोणाचार्यांनीं एकेका शिष्याला पुढें बोलावून नेम धरण्यास सांगितलें. नेम धरल्यावर प्रत्येकाला 'तुला आतां काय काय दिसतें' असें विचारलें, तेव्हां प्रत्येकानें 'झाड, पानें, मंडपांतील लोक सर्व कांहीं दिसतें' असें सांगितलें. सर्वांचा नेम चुकला. शेवटीं अर्जुन आला, त्यानें नेम धरला. मग गुरुजी म्हणाले, 'अर्जुना, तुला आतां काय दिसतें ?' अर्जुनानें उत्तर दिलें, 'गुरुजी, मला आतां फक्त पोपटाचा डोळा तेवढा दिसत आहे.'

गुरुजींची आज्ञा होतांच अर्जुनानें बाण सोडला तो नेमका पोपटाच्या डोळ्यांत शिरला. अर्जुनाचें हें कौशल्य पाहून सर्वांनीं टाळ्यांचा कडकडाट केला.

शेवटीं अर्जुनानें धनुर्विद्येचे निरनिराळे प्रयोग दाखविल्यावर हा कार्यक्रम संपला.

नागरिकांनीं व सर्वांनींच पांडवांची वाहवा केली.

पण कौरवांना बरें वाटलें नाहीं.

ते पांडवांचा अधिकच द्वेष करूं लागले.

## गुरुदक्षिणा

'राजपुत्रांचें शिक्षण पुरें झालें. तेव्हां गुरुदक्षिणा काय देऊं ?' असें दुर्योधनानें द्रोणाचार्यांना विचारलें.

त्यावर द्रोणाचार्य म्हणाले, ' दुर्योधना, तुम्ही सर्व विद्या शिकून तयार झालांत, ह्यांतच मला समाधान आहे. तीच खरी गुरुदक्षिणा आहे. पण तूं म्हणतच असलास तर पांचाळ देशचा राजा द्रुपद ह्यानें माझ्या गरिबीची चेष्टा करून अपमान केला आहे, त्याला कैद करून माझ्यासमोर आणा. म्हणजे मला गुरुदक्षिणा मिळाल्याप्रमाणें होईल. '

लागलाच दुर्योधन आपल्या भावांसह द्रुपद राजावर चालून गेला, पण युद्धांत पराभव झाल्यामुळें कौरवांचा तेथेंही कमीपणा झाला.

मग पांडवांनीं द्रुपदावर स्वारी केली व त्याचा पराभव करून त्याला आपल्या गुरुजींसमोर आणून उभें केलें.

पांडवांचा हा पराक्रम पाहून द्रोणाचार्य संतुष्ट झाले. त्यांनीं पांडवांना खूप चांगले आशीर्वाद दिले.

सर्वांनाच समाधन वाटलें. फक्त कौरवांना मनांतून फार दुःख झालें.

## लाखेचें घर

पांडव पराक्रमी आहेत, शिवाय धर्मराज हा सगळ्यांत मोठा, तेव्हां त्यालाच पुढेंमागें राज्य मिळणार होतें.

ह्या पांडवांचा नाश केल्याशिवाय आपणांस राज्य मिळणार नाहीं, असें वाटून कौरव पांडवांच्या नाशाचे निरनिराळे बेत रचूं लागले.

पांडवांना हस्तिनापुरापासून दूर न्यावयाचें व त्यांच्या नकळत त्यांचा नाश करायचा असा त्यांनीं गुप्त बेत ठरविला.

मग दुर्योधन आपल्या वडिलांस म्हणाला, ' बाबा, आतां

आमचें शिक्षण पुरें झालें आहे. आतां कांहीं काळ आम्हांला राजधानीबाहेर जाण्याची परवानगी द्यावी. धृतराष्ट्रानें होय म्हणतांच दुर्योधन धर्माला म्हणाला, ' धर्मा, तुम्ही पण आमच्याबरोबर चला. वारणावताला आपणांसाठीं दोन सुंदर वाडे तयार आहेत.' धर्मराजानें मोठ्या आनंदानें ती गोष्ट मान्य केली.

इकडे दुर्योधनाने पांडवांसाठीं तयार केलेल्या वाड्याच्या भिंती लाख, कापूर, राळ यांचीं पुटें देऊन त्या चटकन पेट घेतील व एकदम सगळ्या वाड्यांत ज्वाळा पसरतील असें करून ठेविलें.

पांडव ह्या वाड्यांत राहूं लागले कीं, एकादे रात्रीं त्या वाड्याला आग लावून द्यावयाची कामगिरी विरोचन नांवाच्या माणसाकडे दिली.

ही बातमी विदुराला कळली. विदुराचा पांडवांवर फार लोभ होता. त्यानें हें सगळें पांडवांना सांगितलें.

पांडव धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें आपल्या आईसह वारणावतास आले. तेथें येतांच त्यांनीं त्या वाड्यांतून गुप्तपणें बाहेर जातां येईल असें एक भुयार तयार केलें.

मग एके रात्रीं त्यांनींच त्या वाड्याला आग लावून दिली व आपण भुयारांतून गुप्तपणें दूर निघून गेले.

पांडव रहात असलेला वाडा जळून गेला असें समजून कौरव मनांतून आनंदून गेले.

*

## पांडवांचे पराक्रम

इकडे पांडव कांहीं दिवस अरण्यांतच राहिले. तेथें असतांना त्यांनीं अनेक राक्षसांचा नाश केला.

हिडिंबा नांवाच्या राक्षसीबरोबर भीमानें लग्न केलें. त्या हिडिंबेचा मुलगा म्हणजेच घटोत्कच होय.

कांहीं काळ अरण्यांत राहिल्यावर पांडव गुप्त वेषानें एकचक्रा नांवाच्या नगरींत येऊन एका गरीब ब्राह्मणाच्या घरीं राहूं लागले.

ह्या एकचक्रा नगरीजवळच्या रानांत बकासुर नांवाचा एक राक्षस रहात होता. तो ह्या नगरींतील लोकांना फारच त्रास देत असे.

ह्या नगरींतील लोकांना पाळीपाळीनें बकासुराला एक गाडाभर अन्न व एक माणूस एवढें रोज द्यावें लागे.

पांडव ज्या ब्राह्मणाकडे राहिले होते, त्याच्या घरावर ज्या दिवशीं ही पाळी आली, तेव्हां घरांतील सगळींच माणसें दुःखी झालेलीं पाहून कुंतीला फार वाईट वाटलें. ती त्या ब्राह्मणास म्हणाली, ' महाराज, आज गाड्याबरोबर, माझा मुलगा भीम ह्याला जाऊं द्या. तो बकासुराचा चांगला समाचार घेईल. '

यावर तो ब्राह्मण म्हणाला, ' बाई, आपल्याकडे आलेल्या पाहुण्याला संकटांत लोटणें हें योग्य नव्हे, तेव्हां तुम्ही तसें कांहीं करूं नका. ' पण भीम पुढें होऊन म्हणाला, ' महाराज, तुम्ही कांहीं काळजी करूं नका. त्या बकासुराचा नाश करून मी लवकरच परत येईल. '

ब्राह्मणानें ठीक म्हणतांच सर्वांचा आशीर्वाद घेऊन भीम गाडा घेऊन अरण्यांत आला. तेथें गाड्याचे रेडे सोडून तो गाड्यांतील अन्न खाऊं लागला.

इतक्यांत बकासुर तेथें आला. आपलें अन्न हा कोण माणूस



खात आहे हें पाहून त्याला राग आला. रागानें चवताळून त्यानें भीमाला लाथाबुक्क्या मारण्यास सुरुवात केली.

भीमानें तिकडे लक्षच दिलें नाहीं. खाणें संपल्यावर भीम उठला. तेव्हां बकासुर त्याच्या अंगावर धांवून गेला. त्या दोघांची खूप वेळ कुस्ती झाली. शेवटीं भीमानें बकासुराला जमिनीवर पाडलें व त्याचा गळा दाबून त्याला ठार केलें.

भीम परत आलेला पाहून सगळ्यांना आनंद झाला.

ह्यापुढें ह्या गांवांत फार दिवस रहावयाचें नाहीं, लवकरच कोठें तरी जावयाचें असें पांडवांनीं ठरविलें.

इतक्यांत त्यांना द्रुपदाकडील स्वयंवराची बातमी समजली. तेव्हां तिकडे ब्राह्मणवेषानें जावयाचें त्यांनीं ठरविलें.

## द्रौपदीस्वयंवर

द्रुपद राजाला द्रौपदी नांवाची एक मुलगी होती. ती फार सुंदर होती. ती मोठी झाल्यावर राजानें तिचें स्वयंवर करण्याचें ठरविलें. स्वयंवरासाठीं देशोदेशींचे राजे आले होते. त्यांत दुर्योधन व कर्ण हेही होते.

स्वयंवरासाठीं एक सुंदर मंडप तयार केला होता.

ठरलेल्या वेळीं मंडपांत सर्व राजे जमले. त्याच मंडपांत पांडवही ब्राह्मणवेषानें हजर होते.

आरंभीं द्रौपदीचा भाऊ धृष्टद्युम्न द्रौपदीला घेऊन पुढें आला व म्हणाला, 'राजेहो, ही माझी बहीण द्रौपदी. मंडपांत मध्यभागीं मत्स्ययंत्र आहे; त्याचा भेद करून एकाच बाणांत जो कोणी माशाचा डोळा फोडील, त्याच्या गळ्यांत द्रौपदी माळ घालील.'

मंडपांत मध्यभागीं उंचावर अधांतरीं एक चक्र फिरत होतें. त्या चक्रावर एक मासा बसविलेला होता. ह्या चक्राच्या बरोबर खालीं एका मोठ्या थोरल्या घंगाळांत स्वच्छ आणि संथ पाणी होतें. ह्या पाण्यांत चक्राचें प्रतिबिंब दिसत होतें.

खालीं पाण्यांत पाहून बाण मारावयाचा व माशाचा डोळा फोडावयाचा होता.

हें फार कौशल्याचें काम होतें.

प्रथम कर्ण मोठ्या ऐटीनें पुढें आला, पण तो राजा नसल्या-

मुळें त्यानें पण जिंकला, तरी त्याला आपण माळ घालणार नाहीं, असें द्रौपदीनें सांगितलें. तेव्हां कर्ण निमूटपणें आपल्या जागेवर जाऊन बसला. नंतर मत्स्यभेद करण्यास कोणीच पुढें येईना. इतक्यांत अर्जुन पुढें आला व त्यानें एका बाणांत मत्स्यभेद केला. लागलीच द्रौपदीनें अर्जुनाला माळ घातली. त्या वेळी अर्जुन ब्राह्मणवेषांत होता.

द्रौपदीचें राजपुत्राशीं लग्न न होतां एका ब्राह्मणाशीं तिचें लग्न होणार असें वाटून स्वयंवराला आलेले सगळे राजे रागावले व द्रुपदाशीं भांडूं लागले. परंतु अर्जुनानें आपल्या पराक्रमानें त्या सर्वांचा पराभव केला.

मत्स्यभेद करणारा ब्राह्मण नसून अर्जुन आहे हें कळतांच द्रुपदाला व सर्वांनाच आनंद झाला.

पुढें लवकरच पांचही पांडवांबरोबर द्रौपदीचें लग्न झालें. त्यानंतर लवकरच विदुराच्या सांगण्याप्रमाणें धृतराष्ट्रानें पांडवांना हस्तिनापुरी परत बोलाविलें व त्यांना राज्याचा अर्धा वांटा दिला. तेव्हां पांडव इंद्रप्रस्थ येथें राहून राज्य करूं लागले.

## सुभद्राहरण

पांडव इंद्रप्रस्थास सुखानें राज्य करीत होते. कौरवांना हें बरें वाटत नव्हतें. पांडवांचा नाश करण्यासाठीं ते अगदीं टपून होते.

कांहीं काळ अशा प्रकारें गेल्यावर अर्जुनाला त्याच्या हातून कांहीं नियम मोडल्याबद्दल बारा वर्षें तीर्थयात्रा करण्यासाठीं राज्य सोडून जावें लागलें.

ह्या बारा वर्षांत अर्जुन खूप फिरला. त्यानें खूप विद्या संपादन केली व शेवटच्या वर्षी तो द्वारकेजवळ येऊन पोंचला; तेव्हां त्याला कळलें कीं, कृष्णाची बहीण सुभद्रा हिचें लग्न तिच्या मनाविरुद्ध दुर्योधनाशीं करून देण्याचें बलरामदादानें ठरविलें आहे. सुभद्रेचें लग्न अर्जुनाशीं व्हावें असें सुभद्रेला व कृष्णालाही वाटत होतें. पण बलराम वडील भाऊ असल्यामुळें तो कोणाचें ऐकत नव्हता. इतक्यांत अर्जुन द्वारकेजवळ आल्याचें कृष्णाला कळलें. तेव्हां कृष्णानें अर्जुनाची गुप्तपणें भेट घेऊन कांहीं बेत ठरविला. पुढें कृष्णाच्या मदतीनें अर्जुनानें सुभद्रेला पळवून नेलें.

बळरामदादा रागावला. त्यानें यादवांसह अर्जुनाचा पाठलाग केला. अर्जुन धनुर्विद्येंत प्रवीण होता. त्यानें यादवांचा पराभव केला. शेवटीं कृष्णानें बलरामदादाची समजूत घातली.

मग लवकरच सुभद्रेचें अर्जुनाशीं मोठ्या थाटानें लग्न झालें. सुभद्रेला आनंद झाला.

ह्यामुळें कौरव पांडवांचा अधिकच द्वेष करूं लागले.

## राजसूय यज्ञ

याच सुमारास नारदऋषींच्या सांगण्यावरून पांडवांनीं राजसूय यज्ञ करावयाचें ठरविलें. ह्या यज्ञासाठीं दिग्विजय करावा लागतो. त्या कामीं जरासंध नांवाच्या बलाढ्य राजाकडून त्रास होईल असें कृष्णानें सुचविलें. त्याचा आधीं नाश करणें जरुरीचें होतें.

मग भीमानें जरासंधाला मल्लयुद्धास बोलाविलें. दोघांचें युद्ध चौदा दिवस चाललें. शेवटीं जरासंधाचा नाश झाला.

जरासंधाचा नाश केल्यावर पांडवांनीं यज्ञाचा घोडा चारी दिशांस फिरवून विजय मिळविला व खूप संपत्ति जमविली.

सर्व तयारी झाल्यावर राजसूय यज्ञाला सुरुवात झाली. यज्ञसमारंभासाठीं देशोदेशींचे राजे जमा झाले होते. त्यांत कौरवही होतेच.

पांडवांनीं मयसभा नांवाचें सुंदर सभागृह बांधून घेतलें होतें. त्या सभागृहाची रचना अशी होती कीं, जेथें पाणी असेल तेथें जमीन व जमीन असेल तेथें पाणी आहे असें वाटायचें.

त्या सभेंत दुर्योधन आला असतां पाय घसरल्यामुळें पडला, त्यावेळीं द्रौपदी व भीम हीं दोघें त्याला हंसलीं. दुर्योधनाला मनांतून खूप राग आला.

यज्ञसमारंभ संपल्यावर जमलेल्या लोकांचा सत्कार करायचें ठरलें. त्यांत धर्मानें अग्रपूजेचा मान कृष्णाला दिला हें पाहून दुर्योधन व इतर कांहीं राजे यांना पांडवांचा फार राग आला. तेव्हांपासून पांडवांचा नाश करण्यासाठीं कौरव अधिकच प्रयत्न करूं लागले.

## ❀ सर्व कांहीं घालविलें

शकुनि नांवाचा एक सरदार होता. तो कौरवांचा मामा. तो फार दुष्ट नि कपटी होता.

त्याची मदत घेऊन पांडवांचा नाश करण्याचें कौरवांनीं ठरविलें.

पूर्वीं राजेलोक फांशांचा जुगार खेळत. त्या खेळाला द्यूत असें म्हणत.



शकुनीनें पांडवांना कौरवांबरोबर द्यूत खेळावयास बोलाविलें. नाहीं म्हटलें तर आपला कमीपणा होईल असें वाटून धर्मराजानें तें मान्य केलें.

ठरलेल्या दिवशीं खेळ सुरू झाला. धर्मराज साधा होता. त्याला दुष्ट कौरवांनीं खेळांत हरविलें व त्याचें सगळें राज्य व संपत्ति कौरवांना मिळाली. शेवटीं धर्मानें द्रौपदी पणाला लांवली नि तोही पण धर्म हरला.

कौरवांचा आनंद गगनांत मावेनासा झाला.त्यांनीं द्रौपदीला ओढून सभेंत आणलें व तिला आपली दासी बनविण्याचा बेत केला,पण श्रीकृष्णाच्या कृपेमुळें द्रौपदी कौरवांच्या हातून सुटली.

द्यूतांत पांडवांनीं बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास स्वीकारावा असें ठरलें, तेव्हां सर्व राज्य व संपत्ति यांचा त्याग करून पांडव द्रौपदीसह वनवासाला निघून गेले. या वेळीं भीम,

अर्जुन यांना कौरवांचा फार राग आला व ते कौरवांशीं युद्ध करण्यास सिद्ध झाले. परंतु धर्मराजानें त्यांची समजूत घालून त्यांना शांत केलें.

## पांडवांचा वनवास

पांडव द्रौपदीसह काम्यक नांवाच्या वनांत राहूं लागले. ह्या वनांत राहणाऱ्या अनेक राक्षसांचा त्यांनीं नाश केला. नंतर तेथून ते द्वैत नांवाच्या वनांत राहावयास गेले.

ह्या काळांत पांडवांनी अनेक शस्त्रास्त्रें मिळविलीं.

पांडव वनांत गेले तरी पुन्हां तेरा वर्षांनी परत येतील नि मग युद्ध करून आपलें राज्य घेतील अशी कौरवांना भीति वाटत होती. म्हणून मधूनमधून त्यांना त्रास देण्याचा कौरवांचा प्रयत्न चालू होता.

एकदां घोषयात्रेची संधि साधून बरोबर खूप सैन्य घेऊन कौरव वनांत आले. साधलें तर पांडवांचा नाश करायचा असा त्यांचा बेत होता. पण सगळें उलट झालें.

रस्त्यांत कौरवांची व चित्रसेन नांवाच्या गंधर्वराजाची भेट झाली व कांहीं कारणावरून भांडण झालें. शेवटीं कौरवांची व चित्रसेनाची लढाई होऊन कौरवांचा पराभव झाला. मग गंधर्वराजानें दुर्योधन, दुःशासन वगैरे कौरवांना बांधून आपल्या राज्यांत न्यायचें ठरविलें.

इकडे ही बातमी धर्मराजाला कळली. सगळे पांडव व द्रौपदी यांनीं 'ठीक झालें, दुष्टांची भली खोड मोडली'—असें म्हटलें. पण धर्माला तें बरें वाटलें नाहीं. त्यानें आपल्या भावांची समजूत घातली. मग पांडव चित्रसेनावर चालून गेले. त्यांनीं

चित्रसेनाचा पराभव करून कौरवांची सुटका केली. कौरवांनीं लाजेनें माना खालीं घातल्या.

वाईट वाटून येऊं नका असें सांगून धर्मराजानें कौरवांना परत राज्यांत पोंचविलें. असा थोर मनाचा होता धर्मराज.

## अज्ञातवासांतील पराक्रम

वनवासाचीं बारा वर्षे संपल्यावर पांडवांनीं वेष पालटून निरनिराळीं कामें पत्करून विराट देशाच्या राजाकडे रहावयाचें ठरविलें.

विराटनगरीजवळ येतांच पांडवांनीं आपलीं शस्त्रास्त्रें तेथें असलेल्या एका मोठ्या शमीच्या वृक्षावर सुरक्षित अशीं ठेवलीं. मग धर्मानें कंक, भीमानें बल्लव, द्रौपदीनें सैरंध्री, अर्जुनानें बृहन्नडा, नकुलानें तंतिपाळ नि सहदेवानें ग्रंथिक अशीं नांवें घेऊन तीं सर्वजणें राजाकडे निरनिराळीं कामें करूं लागलीं. त्यांत धर्माकडे राजाला सल्ला देण्याचें व भीमाकडे भोजनगृहव्यवस्थेचें काम होतें. द्रौपदी सुदेष्णा राणीची दासी म्हणून राहिली. अर्जुनाने विराट राजाची मुलगी उत्तरा हिला नृत्य, गायनवादन शिकविण्याचें काम पत्करलें. नकुल गुरांचा परीक्षक नि सहदेव घोड्यांचा परीक्षक बनला.

सुदेष्णेचा कीचक म्हणून एक भाऊ होता. तो मोठा पराक्रमी व शूर पण दुष्ट आणि दुर्वर्तनी होता. त्याला विराट राजानें आपला सेनापति नेमिलें होतें.

सैरंध्रीचें सौंदर्य पाहून ती आपली दासी व्हावी असें कीचकाला वाटलें. त्यानें सुदेष्णा राणीला सांगितलें.

द्रौपदीला तें मान्य नव्हतें; पण कीचकाच्या दराऱ्यामुळें

कोणाचें कांहीं चालत नव्हतें. द्रौपदीनें गुप्तपणें रात्रीं भीमाची भेट घेऊन कीचकाचा नाश करण्याचा बेत ठरविला.

मग दुसऱ्या दिवशीं सैरंध्रीसारखा पोषाख करून व बुरखा घेऊन भीम कीचकाकडे गेला.

कीचकाला वाटलें, सैरंध्रीच आली. म्हणून तो मोठ्या आनंदानें पुढें गेला नि भीमाच्या तडाख्यांत सांपडला. भीमानें त्याला ठार मारलें व लागलाच पुन्हां आपल्या जागीं गेला.

कीचकाचा वध कसा झाला हें कोणालाच समजलें नाहीं. परंतु तो सैरंध्रीमुळें झाला म्हणून सुदेष्णेला फार राग आला. तिनें सैरंध्रीला घालवून देण्याचें ठरविलें. शेवटीं सैरंध्रीनें आणखी तेरा दिवस राहूं द्या अशी विनवणी केल्यामुळें सुदेष्णेनें तें कबूल केलें.

## ❀ अज्ञातवास संपला

कीचकाचा वध झाल्याचें ऐकून कौरवांना मोठें नवल वाटलें. कारण कीचक फार बलाढ्य नि पराक्रमी होता. त्याला मारायाचें काम भीमाशिवाय होणार नाहीं. तेव्हां पांडव बहुतकरून गुप्त वेषानें विराटाच्या राज्यांतच रहात असावे असें वाटून पांडवांना शोधून काढण्यासाठीं त्यांनीं मोठें सैन्य घेऊन विराटाच्या राज्यावर दोन बाजूंनीं स्वारी केली. तेव्हां एका बाजूला विराट स्वतः सैन्य घेऊन गेला व दुसऱ्या बाजूकडे त्याचा मुलगा उत्तर हा गेला. त्याचा रथ हांकण्याचें काम बृहन्नडेनें पत्करलें. रणांगणांतील शत्रूंचें अफाट सैन्य पाहून उत्तर घाबरला व रथांतून उडी टाकून पळत सुटला. पण बृहन्नडेच्या रूपानें

असलेल्या अर्जुनानें त्याचा पाठलाग केला. ते दोघे शहराजवळील शमीपाशीं आले. अर्जुनानें त्या वृक्षावरून आपलीं शस्त्रास्त्रें काढून घेतलीं व आपण अर्जुन असल्याचें उत्तरेला सांगितलें. नंतर रथांत बसून अर्जुन रणांगणांत गेला. तेथें बाणांचा वर्षाव करून त्यानें कौरवांच्या सैन्याला पळवून लावलें, व लगेच दुसऱ्या बाजूस जाऊन विराटराजाची सुटका केली.

राज्यांत परत आल्यावर विराटराजानें मोठा दरबार भरवून अर्जुनाचा सत्कार करण्याचें ठरविलें.

इतकें होतें तों अज्ञातवासाची मुदत संपली. पांडव पुन्हां प्रकट झाले. आपणांकडे असलेले हे नोकर म्हणजेच पांडव व सैरंध्री म्हणजे द्रौपदी हें विराटराजाला समजतांच त्यानें पांडवांची क्षमा मागितली. सुदेष्णेनेंही द्रौपदीची क्षमा मागितली. मग मोठा थाटाचा समारंभ होऊन विराटराजानें पांडवांना निरोप दिला. तसेंच राजकन्या उत्तरा हिचा अर्जुनाचा मुलगा अभिमन्यु याच्याशी विवाह करून दिला.

## ❀ राज्य परत मागितलें

पांडव संकटमुक्त होऊन परत आपल्या राजधानींत आले व त्यांनीं कौरवांकडे आपलें राज्य परत मागितलें.

पण कौरव तें देण्यास तयार नव्हते. उगाच भांडण नको म्हणून धर्मराजानें फक्त एकादें गांव आम्हांला द्या असा निरोप दुर्योधनाला पाठविला. परंतु दुर्योधनानें उलट कळविलें कीं, एक गांवच काय, पण सुईच्या टोंकावर राहील एवढी जमीनसुद्धां तुम्हांला मिळणार नाहीं. हें उत्तर ऐकून धर्मराजाला फार वाईट

वाटलें. शेवटीं श्रीकृष्ण स्वतः कौरवांकडे गेला. त्यानें धृतराष्ट्राला व दुर्योधनाला समजुतीच्या गोष्टी सांगून पांडवांना त्यांचें राज्य परत करण्याची विनंति केली. पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

आतां युद्धावांचून कांहींच उपाय नाहीं. म्हणून तुम्ही युद्धाच्या तयारीला लागा असें श्रीकृष्णानें पांडवांना सुचविलें.

इकडे कौरवही सैन्याची जमवाजमव करून युद्धाची तयारी करूं लागले.

## भारतीय युद्ध

शेवटीं कौरव-पांडवांचें युद्ध कुरुक्षेत्रीं सुरू झालें. कौरवांकडे भीष्म, द्रोणाचार्य, कर्ण यांसारखे शूर वीर व अफाट सैन्य होतें. पांडवांकडेही वरेंच सैन्य होतें, तसेंच पांडवांच्या बाजूला श्रीकृष्ण होता. त्यानें अर्जुनाचा रथ हांकण्याचें काम पत्करलें.

हें भयंकर युद्ध अठरा दिवस सुरू होतें. अनेक मोठमोठे शूर वीर मारले गेले. अर्जुनाचा मुलगा अभिमन्यु यानें एके दिवशीं मोठा पराक्रम गाजविला, परंतु तो त्या युद्धांत पडला.

युद्ध करून शत्रूचा नाश करण्यासंबंधीं श्रीकृष्ण अर्जुनाला निरनिराळ्या प्रकारें उपदेश करीत होता. हा उपदेश म्हणजेच भगवद्गीता होय.

युद्धाच्या शेवटच्या दिवशीं भीम व दुर्योधन यांचें भयंकर गदायुद्ध झालें. त्यांत भीमानें दुर्योधनाला मारलें. इतर कौरव यापूर्वींच मारले गेले होते. अर्जुनानें महापराक्रमी कर्णाचा शेवट केला.

अशाप्रकारें लक्षावधि सैन्याचा नाश करणारें युद्ध अठराव्या दिवशीं संपलें.

युद्धांत आपले पुत्र, नातु इत्यादि मारले गेले याबद्दल धृतराष्ट्राला फार दुःख झालें. पांडवांनाही फार दुःख झालें. श्रीकृष्णानें सर्वांची समजूत घातली.

लवकरच चांगला मुहूर्त पाहून धर्मराजाला अभिषेक करून सिंहासनावर बसविलें व खूप संपत्ति खर्च करून अश्वमेध नांवाचा यज्ञही झाला. ह्या यज्ञासाठीं मोठमोठ्या विद्वान ऋषींना बोलाविलें होतें. देशांतील सर्व राजे यज्ञसमारंभाला जमले होते.

ह्या यज्ञाच्या वेळीं मोठ्या प्रमाणावर दानधर्म केला. त्यायोगें सर्वांनाच समाधान वाटलें.

यज्ञ संपल्यावर यज्ञासाठीं जमलेली थोर थोर मंडळी मंडपांत बसून ह्या यज्ञाइतका दानधर्म कुठेंच झालेला ऐकिवांत नाहीं; व असा यज्ञ पण कधीं झाला नाहीं अशाप्रकारें बोलून धर्मराजाची स्तुति करीत होती.

इतक्यांत त्या यज्ञमंडपांत एक मुंगूस शिरलें व यज्ञभूमीवर लोळूं लागलें. त्या मुंगुसाचें अर्धे अंग सोनेरी होतें.

यज्ञभूमीवर खूप लोळल्यावर तें मुंगूस माणसासारखें बोलूं लागलें.

तें म्हणालें, "ह्या यज्ञाची तुम्हीं कितीही स्तुति केली तरी कुरुक्षेत्रींच्या एका ब्राह्मणानें जो दानयज्ञ केला, त्याची सर ह्या यज्ञाला नाहीं. त्याच्या दानयज्ञाच्या जागीं मी लोळलों तेव्हां माझें अर्धें अंग सोन्याचें झालें. पण ह्या यज्ञभूमीवर लोळून मात्र माझा कांहींच फायदा झाला नाहीं."

सर्वांनीं विनंति केल्यावरून मुंगुसानें त्या अन्नान्न स्थितींत असणाऱ्या ब्राह्मण कुटुंबानें स्वतः कित्येक दिवस उपाशी

असूनही मोठ्या प्रयासानें मिळविलेल्या शेरभर पिठाच्या भाकऱ्या भुकेनें व्याकुळ झालेल्या अतिथीला समाधानानें देऊन जो दानयज्ञ केला, त्याची कथा सांगितली. ती ऐकून सर्वांनाच खऱ्या दानयज्ञाची थोरवी समजली.

नुसत्या दानधर्माला विशेष महत्त्व नसून त्यामागें जी भावना असते, तिला फार मोठें महत्त्व आहे ही गोष्ट सर्वांना पटली.

आपण मोठा दानधर्म केला म्हणून धर्मराजाच्या मनांत उत्पन्न होणारा गर्वही नाहींसा झाला.

असो. पुढें पांडवांनीं अनेक वर्षे न्यायानें व अतिशय उत्तम रीतीनें राज्य केलें. प्रजा संतुष्ट झाली. सर्वांना समाधान झालें. त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली.

अशा प्रकारें पांडव सुखानें राज्य करीत असतां त्यांना श्रीकृष्णानें आपलें अवतारकार्य संपविल्याचें समजलें. त्यांना फार दुःख झालें.

आतां आपणही हिमालयांत जावें असें ठरवून पांडवांनीं राज्य सोडलें. ते अनेक दिवस हिमालयांत हिंडत असतां द्रौपदी, नकुल, सहदेव, अर्जुन व भीम यांचा एकामागून एक शेवट झाला.

अशा प्रकारें ही पांडवांची कथा संपली.

❀ समाप्त ❀

या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य कागदवाटप समितीने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दराचा कागद
समितीचे आभार !

BVBK-0400323

नित्योपयोगी संपूर्ण धार्मिक संग्रह

# भक्तिमार्गदर्शन

घरातील लहानथोर मंडळीत धार्मिक श्रद्धा दृढ व्हावी व आयुष्यांत भोगावी लागणारी सुखदुःखे सुसह्य व्हावी यासाठी प्रत्येक माणसाने दररोज परमेश्वराची भक्ती करणे त्याचे कर्तव्य आहे. या संग्रहात, प्रातःस्मरणापासून पूजा, नमस्कार, स्नानविधि, स्तोत्रे, मनाचे श्लोक, भजने, आरत्या, पदे, संतांचे अभंग, शनिमहात्म्य, व्यंकटेश स्तोत्र, अकरावा अध्याय, सण व व्रते, मंगलाष्टके, म्हणी, पाळणे, कहाण्या, अभंग, गीता अध्याय १५ वा, तुळसीमहात्म्य, हरिपाठ, विष्णुसहस्रनाम व शुक्रवारची संतोषी मातेची कहाणी, पांढरे बुधवारचे व्रत इत्यादी नित्योपयोगी धार्मिक गोष्टी सचित्र दिलेल्या आहेत. हे पुस्तक दररोज नियमाने वाचा.

संपादक : शं. का. रायकर, राजापूर

सुंदर तिरंगी मुखपृष्ठ : पृष्ठे ३२०

किंमत ५ रुपये

एका प्रतीसाठी ६ रुपये ५० पैसे मनीऑर्डरीने पाठवा.

जयहिंद प्रकाशन मुंबई २